॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## विद्यार्थी विकास विभाग

जा.क्र. कबचौउमवि/१४/विवि / १८८ /२०२४ दि. २६/०८/२०२४

प्रति,

१) मा. प्राचार्य/ संचालक, कबचौउमविशी संलग्नीत महाविद्यालय, मान्यता प्राप्त परिसंस्था.

२) मा. संचालक/ विभागप्रमुख, विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा-विभाग

**विषय :- रक्तदान शिबिराचे आयोजन करण्याबाबत..**

**संदर्भ :- इंडियन रेडक्रॉस सोसायटी, जळगाव याचे पत्र जावक क्र. ऑगस्ट-१९/ २०२४-२५, दि. २२ ऑगस्ट, २०२४**

महोदय/ महोदया,

उपरोक्त संदर्भांकित पत्रान्वये सद्यस्थितीत रेडक्रॉस रक्तकेंद्रात रक्ताचा तुटवडा जाणवत आहे. त्यामुळे रुग्णसेवा करतांना अडचणी येत आहेत. विद्यापीठाशी जिल्हयातील अनेक महाविद्यालये संलग्न आहेत. या महाविद्यालयाच्या माध्यमातून आपण अनेक सामाजिक उपक्रम राबवून समाजाप्रती असलेल्या आपल्या कर्तव्याची पुर्तता करत आहातच. माननीय जिल्हाधिकारी तथा रेडक्रॉस अध्यक्ष यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार विद्यापीठाशी संलग्न सर्व महाविद्यालयांना आपल्या स्तरावरुन सूचना देवून सर्व प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी यांना सहभागी करुन रक्तदान शिबीराचे आयोजन करावे व या जीवनदायी कार्यात आपले योगदान द्यावे.

सोबतच रक्तदाता सुची तयार करण्यासाठी रक्तदानासाठी ईच्छूक विद्यार्थी प्राध्यापक, शिक्षक, व कर्मचारी यांची रक्तगट व विद्यार्थीनींची हिमोग्लोबीन तपासणी रेडक्रॉस सोसायटी करुन देणार आहे. या शिबीरावेळी रक्तदान करण्यासाठी ईच्छूकांकडून रक्तदान इच्छा पत्र भरुन घेण्यात यावे. आपल्या या जीवनदायी कार्यामुळे महाविद्यालयाला सामाजिक व सार्वजनिक नावलौकिक प्राप्त होईल. आपल्या बहुमोल योगदानामुळे व रक्तदात्यांच्या उत्स्फूर्त रक्तदानामुळे रक्तकेंद्रामार्फत रुग्णांना सुरळीत सेवा देणे शक्य होईल. असे कळविलेले आहे.

आपल्या सुलभ माहितीकरीता संदर्भांकित पत्राची प्रत जोडण्यात येत आहे. त्यानुसार आपण आपले स्तरावर कार्यवाही करावी, हि विनंती.

आपला विश्वासू,

26.8.2024

(डॉ. जयेंद्र दि. लेकुरवाळे)

**संचालक, विद्यार्थी विकास**

**सोबत - संदर्भिय पत्राची प्रत.**

**प्रत -**

१) विभागप्रमुख, मा.कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव

२) विभागप्रमुख, मा.प्र-कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव

३) विभागप्रमुख, मा.कुलसचिव कार्यालय, कबचौउमवि, जळगाव

D/Shivade/General letter

# ✚ Indian Red Cross Society ✚

**DISTRICT BRANCH : JALGAON (MAHARASHTRA)** **Regi.No. :** E-21 Dated 13.07.1953

"Redcross Bhavan", Civil Hospital Road, Jalgaon - 425 001.

**Phone :** 0257-2226233, 2235855, 2236255 **Email :** ircs_jal@yahoo.in, ircs1953@gmail.com

**Facebook :** ircsjalgaon **Web. :** www.redcrossjalgaon.org ▶ **App. :** Redcross



✦ President & District Collector : **Ayush Prasad** (IAS)

✦ Vice President : **Gani Memon** ✦ Chairman : **Vinod Biyani**

✦ Treasurer : **Bhalchandra Patil** ✦ Blood Centre Chairman : **Dr. Prasannakumar Redasani**


जावक क्र- ऑगस्ट - १९ /२०२४-२५ दिनांक- २२ ऑगस्ट २०२४

प्रती,

मा. कुलगुरू,

क.ब.चौ. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,

जळगाव.

विषय- रक्तदान शिबिराचे आयोजन करण्याबाबत विनंती पत्र.

महोदय,

इंडियन रेडक्रॉस सोसायटी जळगाव संचलित रक्तकेंद्र हे गेल्या ४२ वर्षांपासून जळगाव आणि जवळपासच्या जिल्ह्यातील रुग्णांना अखंडितपणे सेवा देत आहे. जळगाव जिल्ह्यातील ७०% रुग्णांना सुरळीत व सुरक्षित रक्तपुरवठा करण्याचे कार्य रेडक्रॉस रक्तकेंद्र करीत आहे. तसेच प्रत्येक वर्षी जवळजवळ २००० रक्तपिशव्या थॅलेसीमिया ग्रस्त बालकांना विनामुल्य रक्तपुरवठा रेडक्रॉस रक्तकेंद्रामार्फत केला जातो.

सद्य स्थितीत रेडक्रॉस रक्तकेंद्रात रक्ताचा तुटवडा जाणवत आहे, त्यामुळे रुग्णसेवा करताना अडचणी येत आहेत. आपल्या क.ब.चौ. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी जिल्ह्यातील अनेक महाविद्यालये संलग्न आहेत. या महाविद्यालयांच्या माध्यमातून आपण अनेक सामाजिक उपक्रम राबवून समाजाप्रती असलेल्या आपल्या कर्तव्याची पूर्तता करत आहातच. माननीय जिल्हाधिकारी तथा रेडक्रॉस अध्यक्ष यांच्या मार्गदर्शक सुचनेनुसार आपल्याशी संलग्न सर्व महाविद्यालयांना आपल्या स्तरावरून सूचना देवून सर्व प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी यांना सहभागी करीत रक्तदान शिबिराचे आयोजन करावे व या जीवनदायी कार्यात आपले योगदान द्यावे. आपल्या या जीवनदायी कार्यामुळे महाविद्यालयाला सामाजिक व सार्वजनिक नावलौकिक प्राप्त होईल. आपल्या बहुमोल योगदानामुळे व रक्तदात्यांच्या उत्स्फूर्त रक्तदानामुळे रक्तकेंद्रामार्फत रुग्णांना सुरळीत सेवा देणे शक्य होईल.

तरी आपणास नम्र विनंती कि आपल्याशी संलग्न सर्व महाविद्यालयामार्फत रक्तदान शिबिराचे आयोजन करून सहकार्य करावे.

आपल्या सहकार्याची अपेक्षा....


उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
कुलगुरू कार्यालय
23 AUG 2?
1779


विनीत,

लक्ष्मण तिवारी

(प्रशासकीय अधिकारी)


Indian Red Cross Society
Reg.No. E-21 Dt. 13/7/1953
Jalgaon District Branch

कवयित्री बहिणाबाई चौधरी
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
१४ विद्यार्थी विकास विभाग
23 AUG 2024
आवक क्र. 705